प्रकरण चौथे

# ‘लोकसखा ज्ञानेश्वर’ मधील समाजदर्शन

प्रकरण चौथे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील समाजदर्शन


४.१ प्रस्तावना

४.२ सामाजिक जीवनाचे चित्रण

४.२.१ व्यवसाय

४.२.२ प्रवासाची साधने

४.२.३ राहणीमान

४.२.४ शेती

४.२.५ श्रद्धा-अंधश्रद्धा

४.२.६ सामाजिक स्तरभेद

४.३ धार्मिक जीवनाचे चित्रण.

४.४ सांस्कृतिक जीवनाचे चित्रण.

४.५ तत्कालीन शिक्षण पद्धती.

४.६ समारोप.

संदर्भ

प्रकरण : चौथे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील समाजदर्शन

## ४.१ प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीत चित्रित झालेल्या समाजदर्शनचा अभ्यास करावयाचा आहे. लेखक हा समाजाचा घटक असतो. त्यांच्या जडणघडणीसाठी जात, धर्म, पंथ, भाषा इत्यादी जबाबदार असतात. विशिष्ट वाङ्मयीन भूमिका घेऊन लेखक वास्तवता, नैतिकता आणि त्याने अंगीकारलेल्या मूल्यविचारांची सांगड घालून लेखन करीत असतो.

तत्कालीन समाज हा रूढी, कर्मकांड, जातीयता, अंधश्रद्धा यांच्या भोवऱ्यात सापडलेला होता. सर्वत्र व्रते, वैकल्य, देवदैवते, मंत्रतंत्र इत्यादीचे अवडंबर माजलेले असे. तसेच समाजात जातीची बंधने कठोर असल्याने जाचक व कठोर बंधने लादली जात असत. धर्माच्या नावावर पशुहत्या मोठ्याप्रमाणात केली जात असत. काम, क्रोध, मोह, लोभ यांच्या आहारी समाज गेलेला असल्याने सत्य, शांती, विवेक, आत्मिक, वैराग्य, समाधान इत्यादी गुणांना समाज पारखा झालेला दिसून येतो. तसेच शास्त्रीपंडितही माणूसकीला पारखी झालेली असत. तत्कालिन सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी जीवनांचे चित्रण सदर कादंबरीत घेता येईल.

## ४.२ सामाजिक जीवनाचे चित्रण :

मध्ययुगीन कालखंडातील महाराष्ट्राच्या समाजजीवनाचे चित्रण 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीत आलेले आहे. तत्कालीन समाजामध्ये असलेले व्यवसाय, लोकांची राहणीमान, विवाह, सामाजिक स्तरभेद, श्रद्धा-अंधश्रद्धा, रूढी-परंपरा इत्यादीचे प्रतिबिंब या कादंबरीत उमटले आहे.

### ४.२.१ व्यवसाय :

तत्कालीन कालखंडामध्ये प्रत्येक गावामध्ये अनेक लहान-मोठे व्यवसाय केले जात असल्याचे दिसून येते. ब्राह्मण, सोनार, कुंभार, सुतार, न्हावी, तांबटान, माळी, वाणी

15430

इत्यादी लोक परंपरागत व्यवसाय करीत असत. 'पैठण' हे बाजारपेठेचे केंद्र असल्यामुळे तेथे अनेक व्यवसाय केले जात होते. गोमेद नावाची पिवळी रत्ने, जरीबुट्टीचे कापड, पैठण्या इत्यादी तेथे तयार केले जात असे. आळंदीच्या सिद्धोपंतानी रुक्मिणीस, विठ्ठलपंताना व त्यांच्या आई-वडिलांना, हैबतीस पैठणमध्ये आहेर खरेदी करून त्यांनी स्वतःसाठी उपरणे खरेदी केले.

त्याकाळी गावामध्ये काही लोक सावकारकी करीत असत. 'विसोबा चाटी' हा ब्राह्मण सावकारकी करीत होता. गोरा कुंभार हा मडकी, गाडगी, पराळ, कुंड्या, कौल, झाकण्या इत्यादी मातीच्या वस्तू तयार करीत. तसेच गावातील काही लोक जनावरांच्या चमड्यापासून वाद्या, मोटा, आसूड, जुपण्या इत्यादी वस्तू तयार करीत.

ज्ञानदेवादि भावंडांनी दिलेल्या दागिन्यांचे वजन आपेगावातील सोनाराने केल्यानंतर ते पाटलाच्या स्वाधीन केले. अशाप्रकारे त्याकाळी गावामध्ये अठरापगड जाती-जमातीचे लोक वेगवेगळे व्यवसाय उपजीविकेसाठी करीत. तत्कालीन काळामध्ये गाव आकाराने लहान असल्याचे दिसते. गावाची वसाहत शक्यतो नदी, विहीर, तलाव व ओढा अशा एखाद्या ठिकाणी वसलेली असत. तसेच त्याकाळी गावामध्ये लहान-लहान घरे व काही मोठे वाडे असत. त्याचबरोबर प्रत्येक गावात मंदिरे असून त्या मंदिरावर निशाण लावले जात असे. त्या मंदिरातील देवांची पूजा गावातील पुजारी करत असत. तसेच मोठ्या गावांच्या ठिकाणी 'बाजारपेठा' व 'धर्मशाळा' असत.

त्याकाळी घरासमोर मोठे अंगण असल्याने तेथे रांगोळी काढली जात असत. तसेच अंगणामध्ये तुळशी वृंदावन व पाण्यासाठी मातीचे रांजण ठेवलेले असत. घरांची रचना देवघर, स्वयंपाकघर, सोपा अशी केलेली असून घरांचे दरवाजे मोठे ठेवलेले असत. तसेच शेतात कुटीची खोपी घालून तेथे शेतीची अवजारे ठेवली जात.

सिद्धोपंतांच्या वाड्यासमोर पाण्याचा मोठा आड होता आणि त्या वाड्यासमोरील अंगणात पाण्याचे मोठे रांजण ठेवलेले होते. तसेच विठ्ठलपंतांना आळंदीच्या ब्राह्मण मंडळींनी वाळीत टाकल्यावर ते सिद्धबेटावर कुटी घालून राहत होते. त्याकाळी गावामध्ये प्रकाशासाठी दिवट्या व पणत्या लावल्या जात असून घरामध्ये समई लावली जात. प्रत्येक गावामध्ये

पाटील, कुलकर्णी व चौगुले हे गावचा व्यवहार पाहत असे. तसेच त्याकाळी गावामध्ये भांडणे व वाद झाल्यास गावसभा घेऊन पंच भांडणे मिटवित होते.

तत्कालीन समाजात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने गावामध्ये शेतकऱ्यांची संख्या जास्त होती. शेतकऱ्यांकडून गावातील कुलकर्णी हे शेतसारा गोळा करत असे. गावामध्ये स्पृश्य-अस्पृश्यता पाळली जात असे. त्याकाळी 'कुलकर्णी' लोक आपली शेती इतरांना खंडाने करण्यास देत. तसेच तत्कालीन काळामध्ये एखाद्या सामाजिक व धार्मिक कार्यासाठी जमीन, घर व सोने दान करण्याची प्रथा असल्याचे दिसते. अशाप्रकारे तत्कालीन ग्राम जीवनांचे प्रतिबिंब सदर कादंबरीत उमटलेले आहे.

**४.२.२ प्रवासाची साधने :**

तत्कालीन समाजामध्ये प्रवासासाठी काही साधने वापरली जात असत. तसेच काही लोक पायी चालत प्रवास करीत आणि ते लांबच्या प्रवासासाठी बैलगाड्यांचा वापर करीत असे. आषाढी एकादशीला विठ्ठलपंत पायी चालत पंढरपुरला जात. तसेच त्यांनी विद्यार्जन पूर्ण केल्यावर उत्तर भारताच्या व विवाहानंतर त्यांनी दक्षिण भारताचा पायी चालत प्रवास केला. विठ्ठलपंत, सिद्धोपंत व त्यांचे कुटुंब, या सर्व मंडळीनी आळंदी, पैठण, आपेगाव, पंढरपूर इत्यादी ठिकाणी बैलगाडीतून प्रवास केला.

विठ्ठल-रुक्मिणी व त्यांची चार मुले यांनी आळंदी व त्र्यंबकेश्वर असा पायी प्रवास केला. तसेच ज्ञानदेवादि भावंडे व संतमेळा यांनी उत्तरेकडे तीर्थयात्रेचा प्रवास पायी चालत केला. त्याकाळी प्रवासाचे अंतर हे कोसावर मोजले जात असे. प्रवासाला जाताना वस्त्रे, वळकटी, पडशा, किरकोळ भांडी, बदली इत्यादी वस्तू बरोबर घेत. प्रवासाच्या वेळी धर्मशाळेत अथवा मंदिरात वस्ती केली जात असे.

ज्ञानदेवादि भावंडांनी पंढरपूर, पैठण, नेवासे, त्र्यंबकेश्वर इत्यादी ठिकाणच्या धर्मशाळेत मुक्काम केला होता. त्याकाळी नदीतून प्रवास करण्यासाठी नावेचा वापर केला जात. तसेच आसपासच्या गावातील लोकांना भेटण्यासाठी, कार्यक्रमांच्या पत्रिका देण्यासाठी, वतनाच्या गावातील शेतसारा गोळा करण्यासाठी, आजारी लोकांना, बाळंतीण

स्त्रियांना वैद्यांच्याकडे नेण्यासाठी बैलगाडीने प्रवास केला जात असत. अशाप्रकारे वरील सर्व उल्लेख सदर कादंबरीत अभिव्यक्त झालेले आहेत.

**४.२.३ राहणीमान :**

तत्कालीन कालखंडामध्ये लोकांची राहणीमान साध्या पद्धतीचे असल्याचे दिसून येते. समाजात धार्मिक संस्कार-समारंभा करीता आलेल्या स्वकीयांना व इष्ट मित्रांना भोजन घालण्याची प्रथा असे. तसेच लग्न समारंभ, मौजी बंधन व विशेष प्रसंगी भोजन घातले जात. सच्चिदानंदबाबांनी संतमेळ्याला पंक्तिभोजन घातले. सिद्धोपंतानी रुक्मिणीच्या विवाहात वतनाच्या गावातील लोकांना भोजन घातले. त्याकाळी समाजात विशेष प्रसंगी जेवण घालण्याची प्रथा असल्याचे दिसते.

त्याकाळी प्रत्येक गावात सर्वसामान्य लोकांची लहान घरे व श्रीमंत लोकांचे वाडे असत. प्रत्येकांच्या घरासमोर लहान-मोठे अंगण असल्याने मध्यभागी तुळसी वृंदावन व एका बाजूस ओसरीची रचना केलेली असे. त्याचप्रमाणे अंगणात पायधुणी व पाण्यासाठी मातीचे रांजण सोप्यामध्ये बसण्यासाठी चौफाळा ठेवलेला असत आणि घरामध्ये अंथरण्यासाठी-पांघरण्यासाठी वळकटी व संतरंजीचा वापर करीत. काही लोक दररोज नदीवर स्नान करण्यासाठी जात.

स्वयंपाकघरात असणाऱ्या वस्तुमध्ये ताट, वाटी, तांब्या, ताटल्या इत्यादी भांडी तर लाकडी वस्तुंमध्ये पाट, चौरंग व तेलाची समई ठेवण्यासाठी ठाणवीचा वापर केला जात असे. नियमित जेवणामध्ये भाजी, भाकरी, कोशिंबीर, चटणी, तूप, मीठ, कांजी इत्यादी पदार्थ असत. तसेच ऐनवेळी शिरा, करंज्या, पोहे, बुंदीचे लाडू व काहीतरी गोड पदार्थ केले जात. त्याचप्रमाणे सणाच्या दिवशी पुरण-पोळीचे जेवण केले जाई आणि घरी आलेल्या पाहुण्यांना गुळ, शेंगा व ऊस देण्याची प्रथाही होती.

स्त्रिया सोन्याचे दागिने घालत असून त्या लग्नानंतर गळ्यात मंगळसूत्र घालत आणि त्या दागिने ठेवण्यासाठी पितळी डब्यांचा वापर करीत. त्याकाळी घरातील देव्हाऱ्यात पितळेचे देव व चलनात सोन्याची नाणी असल्याचे दिसते. समाजातील लोकांच्या पोशाखामध्ये भिन्नता दिसून येते. काही लोक धोतर, उपरणे तर विशेष प्रसंगी पागोटे, फेटा,

बाराबंदी घालत असत. तर स्त्रिया नऊवारी लुगडे, चोळी व जरीबुटीच्या पैठण्या नेसत असत. तत्कालीन समाजात प्रत्येक गावात अठरापगड जाती-जमातीचे लोक राहत होते. तसेच त्याकाळी समाजात लुटारू लोक असल्याचे दिसते. भिल्ल, गौंड यासारख्या जमाती प्रवाशांना लुटत असत.

### ४.२.४ शेती :

तत्कालीन समाजामध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय होता. शेती ही पावसावर अवलंबून असल्याने फक्त जिरायती पिके घेतली जात असत. तसेच काही शेतकऱ्यांच्या विहिरी असल्याने ते बारमाही पिके घेत असत. तर बारमाही पाणी असणाऱ्या ठिकाणी बागायती शेती केली जात असे. शेतकरी विहिरीना मोट बसवून शेतातील पिकांना पाणी देत असत. त्याकाळी शेतामध्ये ऊस, हरभरा, शेंगा, भाजीपाला, भात, ज्वारी, बाजरी, मिरची, कडधान्ये इत्यादी पिके घेतली जात. तसेच शेतामध्ये आंबे, बोरे, केळी इत्यादी फळफळावलीचीही झाडे होती.

शेतकरी पहाटे लवकर उठून शेताच्या कामासाठी बैलगाड्या घेऊन जात आणि ते शेतामध्ये जमिनीची कुळवट, नांगरट, मशागत बैलांच्या साहाय्याने करीत. तसेच शेतकरी शेतातील पिकांचे पशुपक्ष्यापासून संरक्षण करीत. शेतातील कामासाठी बैले तर दुधासाठी म्हैसी, गायी शेतकरी पाळत असून त्यांना चारा, कडबा व गवत शेतकरी घालत. अनेक लोक आपली शेती खंडाने करण्यास इतरांना देत असत. तत्कालीन समाजात शेती करण्याच्या पद्धतीबाबत मु. ग. पानसे म्हणतात, ''आपल्या वाट्यास आलेली जमीन कोणत्या प्रकारे कसावी हे ज्याच्या त्याच्या मनावर होते. कुटुंबीयांच्या मदतीने एखाद्याने आपल्या शेताची मशागत घरीच करावी अथवा कुळवणी, पेरणी, कापणीची सर्व कामे मजुरीने देऊन स्वतः फक्त देखरेख करावी. नाहीतर आपल्या कुळाकडे खंडाने द्यावी. हे सर्व प्रकार यादवांच्या राज्यात प्रचलित होते.''[१] आळंदीच्या सिद्धोपंताची सर्व शेती हैबती व त्यांचे कुटुंब करीत होते. गावातील ब्राह्मणांना वतनाची गावे दिली जात आणि ते शेतकऱ्याकडून धान्याच्या मोबदल्यात शेतसारा वसूल करीत. पावसाळ्यामध्ये शेतकऱ्यांना शेतातील अनेक कामे करावी लागत. याचे वर्णन सदर कादंबरीत असे आलेले आहे,

''नेवाशात सगळी भावंडं संध्याकाळी येऊन पोचली. पिकापाण्याचे दिवस होते. शेतावर गेलेले लोक दिवसभर खुरपणी भांगलणी, गवत कापणी, कोळपणी इत्यादी करून, गुराढोरांना चारून गावाकडं परतत होते.''[२] त्याकाळी पुरुषाबरोबर स्त्रियाही शेतात काम करीत असल्याचे दिसते.

शेती या व्यवसायाबरोबर तत्कालीन समाजात लहान-मोठे व्यापार करणारे लोक होते. पैठण हे व्यापारीचे केंद्र असल्यामुळे तेथे कपड्यांचा व्यापार मोठ्याप्रमाणात चालत असत. त्याकाळी ब्राह्मण लोकांना वतनासाठी काही गावे दिली जात असल्यामुळे ते शेतकऱ्यांकडून सुगीच्यावेळी धान्याच्या स्वरूपात महसूल गोळा करीत. काही ठिकाणी पैशाच्या तर काही ठिकाणी धान्याच्या स्वरूपात व्यवहार चालत असे. तत्कालीन समाजात शेती हा व्यवसाय आर्थिक जीवनाचा कणा असल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील उत्पन्नावर आर्थिक व्यवहार चालत असे. शेतकरी बैल, म्हैस, गायी इत्यादी जनावरे उपजीविकेसाठी पाळत असत. तसेच त्याकाळी गावामध्ये अठरापगड जाती-जमातीचे लोक राहत असल्याने ते सर्व शेतीशी निगडित व एकमेकांवर विसंबून असत.

**४.२.५ श्रद्धा-अंधश्रद्धा :**

तत्कालीन समाजामध्ये जातिभेदाप्रमाणेच श्रद्धा-अंधश्रद्धा मोठ्याप्रमाणात अस्तित्वात होती. त्याकाळी समाजात व्रत-वैकल्ये, भूतबाधा, अंगात येणे, नवस करणे इत्यादी श्रद्धा-अंधश्रद्धा होत्या. आळंदीच्या सिद्धोपंतानी विठ्ठलपंताना भोजनासाठी आपल्या घरी नेल्यावर त्यांच्या पत्नी उमाबाईनी दारातच त्यांच्या पायावर पाणी घालून भाकरीचे तुकडे ओवाळून टाकले आणि तिने घरात आल्यावर त्यांची दृष्ट काढली. तसेच त्याकाळी ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला जात असल्याने विवाहाच्यावेळी वधू-वरांची कुंडली पाहण्याची प्रथा होती.

विठ्ठलपंताना पुत्रप्राप्ती नसल्याने ते मित्रांशी बोलतानाच म्हणतात, ''पुत्रप्राप्ती नसेल तर पुढच्या सर्व पिढ्या नरकात जातील, असं धर्मशास्त्र सांगतं, असे माझे श्वसुर मला सारखे बजावत आहेत. त्यामुळं इकडे आड आणि तिकडे विहीर अशी माझी कुंठित अवस्था झाली आहे.''[३] अशाप्रकारे विठ्ठलपंत हे श्रद्धाळू वृत्तीचे असल्याचे दिसते. समाजामध्ये स्त्रियांच्या

अंगात येणे, असे ही प्रकार दिसून येतात. तसेच प्राण्यांचा बळी देण्याची प्रथा होती. त्याकाळी समाजात विधवा स्त्रियांना कमी दर्जा दिला जात आणि काही स्त्रिया मुंडन व वेणीदान करत. तसेच समाजात पितृश्राद्ध घालण्याची प्रथा असे. लोक पापपुण्यातून मुक्त होण्यासाठी काही पवित्र नद्यांमध्ये स्नान करत असल्याचे दिसते. अशाप्रकारे तत्कालीन रूढी परंपरेचे प्रतिबिंब या कादंबरीत उमटले आहे.

तत्कालीन समाजात विवाह हा विधी तीन दिवसांचा असे. तसेच त्याकाळी विवाह ठरविण्यापूर्वी गणगोत, स्नेही, शाखा, कुलगोत्र, घराणे इत्यादी बघण्याची प्रथा होती. त्याचबरोबर वधु-वरांची कुंडली व गुण बघितले जात. विठ्ठल-रूक्मिणी यांचा विवाह ठरविण्यापूर्वी कुंडली, गुण, शाखा, घराणे इत्यादी बघितले होते. विवाहास पाहुण्यांना, मित्रांना व गावातील मंडळीना निमंत्रित केले जात. तत्कालीन काळात विवाहासाठी मंडप घालण्याची, विवाहात वधु-वरास हळद लावण्याची, बांशिगे बांधण्याची व वाद्ये वाजविण्याची प्रथा होती. तसेच विवाहात वधुच्या गळ्यात मंगळसूत्र घातले जात.

विठ्ठल-रुक्मिणीच्या विवाहाचे वर्णन या कादंबरीत पुढीलप्रमाणे येते, ''नियोजित शुभ मुहूर्तावर अक्षता पडल्या. वधू-वर लग्न मंचापाशी जाऊन सर्वाचं अभिवादन घेत उभे राहिले. विठ्ठलाला अनेकजण गर्दीतून येऊन भेटू लागले. त्याला गंधाक्षता लावू लागले. नमस्कार करू लागले. अक्षता पडल्यावर मंडपाबाहेर वाद्ये जोरात वाजू लागली. भटजींच्या सूचनेवरून वधू-वर वाड्यातील देवघरात देवदर्शनासाठी जाऊ लागली. विठ्ठलाला सावकाश चालावं लागतं होतं. उपरण्याला रुक्मिणीच्या अंगावरील वस्त्राची गाठ मारली होती.''[४] विवाहासाठी आलेल्या मंडळीना भोजन घालण्याची प्रथा असून विवाहात पाहुण्यांना आहेर घेतला जात. अशाप्रकारे तत्कालीन विवाह पद्धतीचे वर्णन या कादंबरीत चित्रित झाले आहे.

तत्कालीन काळात स्त्रियांच्यावर अनेक जाचक बंधने लादली जात असे. स्त्रियांचे शिक्षण फारसे झालेले नसल्यामुळे काही स्त्रियांनाच फक्त वाचन-लेखन करता येत असे. त्यामुळे काही स्त्रिया श्रद्धा-अंधश्रद्धा मानत असत. तसेच त्या काळातील स्त्रियांच्या जीवनाबद्दल सुहासिनी इर्लेकर म्हणतात, ''आधुनिक स्त्री जीवनांच्या तुलनेने प्राचीन व

मध्ययुगीन स्त्री जीवन कमालीचे मर्यादित आहे. प्रापंचिक, सामाजिक व धार्मिक बंधनांनी ह्या काळातील स्त्री जीवनास जखडून टाकले आहे. ह्या सर्व प्रकारच्या बंधनांचे एक नीतिशास्त्रच तत्कालीन समाजाने तिच्यासाठी निर्माण करून ठेवले आहे. कन्या, सून, पत्नी व माता म्हणून म्हणजे जीवनात तिच्या ज्या ज्या भूमिका असणे शक्य, त्या सर्वांच्या संदर्भात तिने कसे वागावे ह्या संबंधीचा आदर्श तिला या नीतिशास्त्रानेच सतत पुरविला आहे.''[५] अशाप्रकारे तत्कालीन समाजाने स्त्रियांच्यावर अनेक बंधने लादल्यामुळे तिला फारसे स्वातंत्र्य नव्हते. समाजाने जे निर्बंध घातलेले आहेत. त्याप्रमाणेच स्त्रियांना वागावे लागत. त्याकाळी स्त्रियांचे वय दहा-बारा वर्षे झाले की विवाह केला जात. तसेच त्यांना स्वयंपाक व घरातील सर्व कामे करावी लागत रुक्मिणीला बारा वर्षे पूर्ण झाल्यावर तिचा विवाह विठ्ठलपंताशी करण्यात आला. या कादंबरीतील उमाबाई, मुक्ताई, रुक्मिणी, पारुबाई इत्यादी स्त्रिया स्वयंपाक व घरातील काम करत असल्याचे दिसते. विवाहानंतर स्त्रिया गळ्यात मंगळसूत्र घालत. त्याकाळी काही स्त्रिया पुरूषाबरोबर शेतात काम करीत. त्याचबरोबर त्या पुरुषाबरोबर प्रवासही करीत. त्या काही धार्मिक स्थळांना भेटी देत. हैबती व त्यांच्या कुटुंबातील स्त्रिया सिद्धोपंताच्या शेतात काम करीत होत्या. त्याकाळी स्त्रिया पतीच्या आज्ञेत राहत. पण विधवा स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा नसत. तसेच विवाहित स्त्रीस अपत्य प्राप्ती झाली नसेल तर समाजाचा त्या स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा असत. स्त्रियांच्या पोशाखामध्ये भिन्नता असल्याचे दिसते. त्या नऊवारी लुगडे, चोळी व जरीबुटीच्या पैठण्या नेसत.

थोडक्यात या कादंबरीत आलेल्या स्त्रिया निर्मळ, हळव्या व सात्त्विक वृत्तीच्या होत्या. तसेच त्या भावनाप्रधानही होत्या. त्या श्रद्धा-अंधश्रद्धा मानणाऱ्या असल्या तरी गुरूंची, साधूंची व आज्ञाधारक पुरुषांची सेवा करीत होत्या आणि त्या आलेल्या संकटाला, दुःखाला सामोरी जात असल्याचे दिसते. त्याचबरोबर त्या सामाजिक व धार्मिक समारंभामध्ये सुद्धा सहभागी झाल्याचे दिसून येते. तसेच आपल्या पतीच्या जीवनात शेवटपर्यंत साथ देणाऱ्या स्त्रियांचे दर्शन येथे घडते. कन्या, पत्नी, माता अशा स्वरूपातच स्त्री जीवनाचे चित्रण सदर कादंबरीत आल्याचे दिसते.

### ४.२.६ सामाजिक स्तरभेद :

तत्कालीन समाजात स्पृश्य-अस्पृश्यता पाळली जात असे. याबाबत मु. ग. पानसे म्हणतात, ''गावकीचें काम करून कायम गावांत राहणाऱ्या अनेकविध शूद्रजातीखेरीज आपले खेळ करीत गावोगाव फिरणारी गारुडी, कोल्हाटी वगैरे जमातींची उपरी कुटुंबे आणि भिल्ल, पारधी यासारख्या शिकारी वन्य टोळ्या काही दिवस गावाबाहेर पाली ठोकून राहत. वेशीच्या आंत वसति येऊं न देण्या इतक्या हीन गणलेल्या अस्पृश्यामध्ये सुद्धा महार, मांग अशा जाती होत्या.''[६] त्याकाळी प्रत्येकांच्या व्यवसायानुसार पोट जाती निर्माण झाल्या होत्या. ज्ञानदेव पंढरपुरातील वारकरी सभेत भक्तांना जातिभेदाविषयीचे विचार सांगताना म्हणतात, ''परमेश्वराला जातगोत नाही. जातगोत, भेदभाव, वरचा-खालचा हे क्षुद्रवृत्तीच्या, अहंकारी, स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या पशुवृत्तीच्या माणसांनी स्वार्थासाठी केलेले भेदभाव आहेत. पंढरीरायापाशी हे भेदभाव नाहीत.''[७] अशाप्रकारे तत्कालीन समाजात अठरापगड जाती-जमातीचे लोक राहत असल्याचे दिसते.

त्याकाळी असलेल्या अनेक पशु-पक्ष्यांचे उल्लेख या कादंबरीत आलेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने मोर, बगळे, कोकीळ, पोपट, वाघ, सरडे, खारी, कोल्हे, हरीण, सर्प, ससे इत्यादी पशु-पक्षी त्याकाळी आढळत असल्याचे दिसते. तत्कालीन कालखंडामध्ये असलेल्या अनेक वृक्ष-वेल्लीचे उल्लेख या कादंबरीत आल्याचे दिसते. पिंपळ, बोरी, हिरडा, आंबा, चिंच, पळस, चंदन इत्यादी वृक्षे त्याकाळी असल्याचे दिसते. पावसाळा ऋतूचे वर्णन या कादंबरीत पुढीलप्रमाणे आलेले आहे, ''मृगाचं नक्षत्र पावसाच्या उड्या मारत गेलं. आर्द्रा मात्र संथ लयीनं पडल्या. भरपूर पाऊस झाला. रानातील उष्णता निघून गेली. रानं थंडगार झाली. प्राणीमात्रांची मनं थंड झाली. ओढे-नाले एकदा-दोनदा वाहून गेले. माळाला, बांधाला हिरवळ फुटू लागली. उन्हाळाभर कडबा, गवतं यांचा कोरडा चारा खाऊन दिवस काढणारी गुरं-वासरं हिरवळीकडं बघून आनंदित झाली. कधी एकदा गळ्याचं दाव सुटतं, असं त्यांना होऊन गेलं. सगळीकडं उल्हास पसरला. पक्षीही दिवसभर इकडं-तिकडं उडू फिरू लागले. अधूनमधून बांधांवर ससे दिसू लागले.''[८] अशाप्रकारे पाऊस

पडल्यामुळे निसर्गात बदल झाल्याचे दिसून येते आणि निसर्ग वर्णनामुळे ही कादंबरी एक वेगळाच ठसा उमटविते.

### ४.३ धार्मिक जीवनाचे चित्रण :

तत्कालीन समाजात अनेक धर्मपंथ उदयास आल्याचे दिसते. शैव, वैष्णव, महानुभव, वारकरी इत्यादी संप्रदाय होते. या धर्मपंथाचा प्रसार संपूर्ण महाराष्ट्रात झाल्याने धार्मिक जीवनात फार मोठे बदल घडून आले. या कालखंडात महाराष्ट्रात यादवांचे राज्य होते. नाना प्रकारची दैवते, व्रत-वैकल्ये, मंत्र-तंत्र, कर्मकांड इत्यादी गोष्टींचा समाजात सर्वत्र सुकाळ झाला होता. या काळात लोकांच्या दैनंदिन जीवनावर कर्मकांडाचे ओझे होते आणि समाजात अनेक धर्म कल्पना निर्माण झालेल्या होत्या. त्याचबरोबर त्याकाळी अनेक देवळे व धार्मिक स्थळे अस्तित्वात असल्याने तेथे यात्रा भरत होत्या. तसेच काळी समाजात स्पृश्य-अस्पृश्यता धर्मभावनेतून निर्माण झालेली होती. लोकांच्या मनात गुरूबदल व मूर्तिपूजेबदल श्रद्धाभाव होता. 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीत चित्रित झालेल्या तत्कालीन धार्मिक जीवनाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

सदर कादंबरीत अनेक धार्मिक स्थळांचा उल्लेख आलेला असून यातील काही धार्मिक स्थळांच्या ठिकाणी मोठ्या यात्रा भरत. पैठण, पंढरपूर, काशी, वाराणशी, द्वारका, त्र्यंबकेश्वर, मथुरा, आळंदी, नाशिक इत्यादी धार्मिक स्थळांची वर्णने कादंबरीत येतात.

'पंढरपूर' या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी आषाढी, तुळसी व कार्तिकी एकादशीला पांडुरंगाच्या दर्शनासाठी हजारो वारकरी यात्रेनिमित्त एकत्र येत असत. तसेच वारकरी भक्तिभावाने चंद्रभागेत स्नान करून भजन, कीर्तन, अभंग म्हणत असत. विठ्ठलपंत व त्यांचे मित्र दरवर्षी आषाढी वारीस पंढरपुरला येत असत. आपल्या वडिलांची ही परंपरा ज्ञानदेवांदि भावंडांनी पुढे चालू ठेवलेली होती.

'पैठण' हे गोदावरी नदीच्या तीरावर वसलेले असून ते दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. ते एक महान धर्मतीर्थ असून तेथे अनेक लहान मोठी मंदिरे आहेत. तेथील गोमेद नावाची पिवळी रत्ने, जरीबुट्टीचे कापड व पैठण्या प्रसिद्ध असल्याने तेथे मोठ्याप्रमाणात व्यापार चालत होता.

'त्र्यंबकेश्वर' हे तीर्थक्षेत्र बारा ज्योतिर्लिंगापैकी एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून ते ब्रह्मगिरी पर्वताच्या रूपाने उभे आहे. शिवाचेच नाव म्हणजे त्र्यंबकेश्वर होय. तसेच तेथे श्रीराम, श्रीकृष्ण, नीलांबिका, लक्ष्मीनारायण इत्यादी प्रसिद्ध देवदेवतांची मंदिरे आहेत. त्याचबरोबर तेथील निसर्गरम्य वातावरणामुळे भाविकांचे मन प्रसन्न होते.

'नाशिक' हे एक पुण्यक्षेत्र असून ते पश्चिम काशी म्हणून ओळखले जाते आणि ते भारतातील पाच प्रमुख महातीर्थातील एक आहे. ते गोदावरी नदीच्या दोन्ही तीरावर असल्याने तेथे अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. 'नाशिक' हे नाव कसे पडले याची आख्यायिका या कादंबरीत पुढीलप्रमाणे सांगितली आहे, "रामबंधू लक्ष्मणानं इथल्या दंडकारण्यातील मायावी राक्षसी शूर्पणखेचे नाक, कान कापून तिला कायमची विद्रूप केली होती. 'नाक' म्हणजे 'नासिका' त्यावरून या नगराला 'नासिक' असं नाव रुढ झालं होतं."[९] नाशिक हे ऋषीची तपोभूमी व मानवांची मोक्षभूमी म्हणूनही ओळखले जाते.

'काशी-वाराणशी' हे बारा ज्योतिर्लिंगापैकी अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र असून ते तीर्थक्षेत्र सर्वश्रेष्ठ मानले जाते. तसेच काशीचे महत्त्व या कादंबरीत आहे, "ह्या नगरीची प्राचीनता, पवित्रता आणि प्रशस्ता याबाबतीत काशीची बरोबरी भारतातील कोणत्याही नगरीला करता येणार नाही. धर्मपीठ आणि विद्यापीठ दोन्ही इंथ आहेत. त्यामुळं भारतीय संस्कृती, विद्या आणि तत्त्वज्ञान इंथ एकवटलं आहे. काशीत ज्या माणसाला मृत्यू येतो तो जन्मजन्मांतराच्या फेऱ्यांतून कायमचा मुक्त होतो, असं मानलं जातं. त्यामुळं देशाच्या कानाकोपऱ्यांतून अनेक लोक देहत्यागासाठी काशीमध्ये येतात."[१०] अशाप्रकारे त्याकाळी काही धार्मिक स्थळांना महत्त्व असल्याचे दिसून येते.

सदर कादंबरीमध्ये अनेक पवित्र नद्यांचा उल्लेख आल्याचे दिसते. गंगा, यमुना, सरस्वती, प्रयाग, काशी, इंद्रायणी, चंद्रभागा, नर्मदा इत्यादी नद्या त्याकाळी पवित्र मानल्या जात होत्या. ज्ञानदेव काशी-प्रयाग या पवित्र नद्यांची माहिती संतमेळ्यास सांगताना म्हणतात, "प्रयाग हे एक महान तीर्थ आहे. तिथं गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन महत्त्वाच्या नद्यांचा संगम झाला आहे. या संगमाला 'त्रिवेणी संगम' म्हणूनही ओळखलं जातं. पण सरस्वती नदी अदृश्य आहे. या संगमावर गंगा-यमुना अतिविस्तृत झालेल्या

आहेत. त्यामुळं तिथं जलसागर असल्याचा भास होतो. ह्या प्राचीन आणि पवित्र अशा नद्या असल्यामुळं प्रयागला स्नान करणं अतिभाग्याचं समजलं जातं. आपणास माहीतच आहे, की गंगा ही तर प्रत्यक्ष भगवान शंकराच्या जटांतून खाली पडणारी आणि भक्तासाठी धावत येणारी महासरिता समजली जाते. म्हणून या संगमावरचं स्नान स्वर्गप्रद समजलं जातं पद्म पुराणात तर असं म्हटलं आहे, की ग्रहांमध्ये सूर्य, ताऱ्यांमध्ये चंद्र श्रेष्ठ आहेत, तसेच तीर्थांमध्ये 'प्रयाग' हे सर्वोत्तम तीर्थ आहे. म्हणून प्रयाग तीर्थाचा केवळ नामोच्चार केला तरी पुनर्जन्माचा क्षय होतो, असं मानलं जातं.''[११] त्याकाळी या नद्यांच्या ठिकाणी लोक श्रद्धेने मुंडन व वेणीदान करीत असत. तसेच तेथे पितृश्राद्धही घालत असे. तत्कालीन समाजात पुण्य प्राप्त होण्यासाठी लोक नवस व व्रते करीत असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत कादंबरीमध्ये लेखकाने काही पुराणकथांचा समावेश केल्यामुळे ही कादंबरी इतर कादंबरीपेक्षा वेगळेपण दर्शविते. विठ्ठलपंतानी ब्रह्मगिरी येथे 'गौतमी नदी' कशी प्रगट झाली. याविषयीची पुराण कथा ज्ञानदेव व निवृत्तीला सांगितली. ब्रह्मा, विष्णू, इंद्र इत्यादी देवदेवता प्रत्यक्ष ब्रह्मगिरीवर आले होते. तसेच अनेक ऋषी तेथे तपाचरण करीत होते. गौतम ऋषी ही ब्रह्मगिरीवर राहत असून तो साळ पिकाची शेती करीत होता. त्या शेतामधील साळ गाईंनी खाल्याने गौतमला राग आला व त्याने गाईना मारल्यामुळे त्या मरण पावल्या होत्या. त्यांचे पाप लागू नये म्हणून त्याने शिवाची आराधना करून त्यांना प्रसन्न करून घेतले व ब्रह्मगिरीवर गंगा प्रगट व्हावी अशी याचना केली. त्याप्रमाणे तेथे प्रगट झालेली गंगा म्हणजे गौतमी नदी होय. या नदीत स्नान केल्यामुळे पुण्य लाभते. अशी कथा विठ्ठलपंतानी सांगितल्यामुळे त्यांच्या मुलांच्या मनावर एक वेगळाच प्रभाव पडला व बुद्धीला चालना मिळाली.

विठ्ठलपंतानी सोपानला ब्रह्मगिरी पर्वताची व त्र्यंबकेश्वरची पुराण कथा सांगितली. हे जग व सृष्टी निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाला एकदा गर्व झाल्याने तो पालनकर्त्याला विष्णुदेवाला म्हणाला की, सर्व देवाचा देव असलेल्या शिवशंकरांचा महिमा व तो कुठे राहतो याचा पत्ता फक्त मलाच माहीत आहे. हे ऐकून विष्णूला आश्चर्य वाटल्याने तो म्हणाला की, मी बरेच वर्षे तप करून सुद्धा मला तो कुठे राहतो आहे हे अजून समजलेले नाही. तेव्हा

त्यांचा पत्ता मला साक्षीपुराव्यासह सांगा असे नम्रपणाने विष्णू म्हणाल्यावर ब्रह्मदेवाने शिव-शंकरांचा खूप शोध घेतला. पण त्यांचा पत्ता मिळाला नसल्याने त्याने एक कपट रचले. आपल्या मंत्रशक्तीने एक गाय निर्माण करून तिला आपल्या बाजूने साक्ष देण्यास सांगितले आणि देवलोकांत देवांना सांगितले की, ''मी सर्व देवांचा देव असलेल्या शिवाला भेटून आलो. त्याची पूजा केली. त्याच्या मस्तकावर दुधाचा अभिषेक केला. मला अतिशय आवडणारं केतकीचं फूल त्याला अर्पण केलं, ज्या गाईचं दूध मी अभिषेकासाठी घेतलं ती पृथ्वीलोकातील गाय त्याला साक्ष आहे.''[१२] असे ब्रह्मदेव सर्व देवांना सांगत असल्याने इंद्रदेवाला व त्यांच्या मित्रांना शंका आल्यावर ते शिवलोकात जाऊन शिवशंकराला त्यांनी विचारले. तेव्हा शिवशंकराने 'हे खरे नाही' असे सांगून तो संतापला व खोटे सांगणाऱ्या ब्रह्मदेवास शाप दिला. 'आजपासून पृथ्वीतलावर तुझी पूजा कोणीही करणार नाही' असा शाप दिल्याने ब्रह्मदेवाने चिडून प्रतिशाप दिला 'तू पृथ्वीतलावर पर्वत होऊन राहशील' त्यानंतर थोड्यावेळाने दोघांचाही राग ओसरला, ब्रह्मदेवाने चूक कबूल करून शिवाचा महिमा गायिला व स्तुती केली. यामुळे भोळा सांब राग विसरून ब्रह्मदेवाला प्रसन्न झाला व मोठ्या आनंदाने पृथ्वीतलावर पर्वताचे रूप घेऊन वास्तव करू लागला. या घटनेची आठवण म्हणून त्यांने त्या पर्वतास ब्रह्मदेवाचे नाव देल्याने तो 'ब्रह्मगिरी' या नावाने ओळखला जातो. तर त्या पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या मंदिरात राहणारा 'शिव' म्हणजेच त्र्यंबकेश्वर होय. ह्या घटनेपासून प्रत्यक्ष 'शिव' ब्रह्मगिरी पर्वताच्या रूपाने पृथ्वीतलावर उभा आहे.

नेवासे येथील मंदिरात मोहिनीराजाची नूर्ती होती. त्या मूर्तीचे अर्धे रूप पुरुषाचे व अर्धे रूप स्त्रीचे असल्याने त्यास 'मोहिनी-राज' असे म्हटले जाण्यामागील पुराण कथा ज्ञानेश्वरांनी सोपान व मुक्ताईला सविस्तर सांगितली. विष्णूने अमृताचे वाटप करताना मोहक मोहिनीचे रूप घेतले व तिने देव-दानवांना दोन पंक्ती करण्यास सांगितल्या. दोन स्वतंत्र पंक्ती झाल्यावर तिने प्रथम देवांना अमृत वाटल्याचे पाहून हावरट राहू-केतू या राक्षसांनी वेषांतर करून देवांचे रूप धारण केले व सूर्य-चंद्र यांच्यामध्ये जाऊन बसले. त्यामुळे नकळत त्यांनाही देव समजून तिने अमृत वाटले. पण ते पिण्याच्या अगोदर सूर्य-चंद्र यांच्या लक्षात आल्याने त्यांनी मोहिनीला ते राक्षस असल्याचे खूण करून सांगितले. तेव्हा विष्णूने सुदर्शन

चक्राला आपल्या हाताने येण्यास आवाहन केले. पण तो स्त्री रूपात असल्याने आवाहन करता येत नव्हते. त्यासाठी तिला मूळ विष्णूचे रूप धारण करणे आवश्यक होते. पण तसे केल्यास आपण केलेले सर्व कट त्यांना समजेल. म्हणून त्याने देवांच्या बाजूचे अर्धे रूप पुरुषांचे व दानवांच्या बाजूचे अर्धे रूप स्त्रीचे ठेवले आणि सुदर्शन चक्राला आवाहन करून राहू-केतू या राक्षांना ठार मारले. त्यानंतर तिने देवांना अमृत वाटून संपवल्याने दानव चिडले व देवांशी युद्ध केले. पण अमृत प्राशन केल्यामुळे देव अमर झाले आणि दानव मारले गेले. या नाट्यपूर्ण घटनेमुळेच विष्णूचे अर्धे रूप स्त्रीचे व अर्धे पुरुषाचे असल्याने त्यास 'मोहिनी-राज' असे म्हणतात. त्यांच्या या विलक्षण अवतार रूपाचे हे मंदिर नेवासे येथे आहे. अशी ही कथा ज्ञानदेवांनी भावंडांना सांगितली.

## ४.४ सांस्कृतिक जीवनाचे चित्रण :

तत्कालीन समाजजीवनावर परमार्थाचा मोठा प्रभाव होता. तसेच त्याकाळी देवळे, मठ, धर्मशाळा यांच्या आश्रयाने अनेक लोक राहत असत. तत्कालीन समाजात अनेक सण व उत्सव मोठ्याप्रमाणात साजरे केले जात असत. तसेच त्याकाळी कला-क्रीडा ही अस्तित्वात होत्या. तत्कालीन समाजात देवळे ही मोठी सांस्कृतिक केंद्रे असल्याने तेथे कीर्तन, प्रवचन, भजन, पुराण यांचे कार्यक्रम होत आणि तेथे धर्मसभाही घेतल्या जात. तीर्थयात्रा, श्राद्धविधी, दानधर्म इत्यादीमध्ये तर समाज गुरफटून गेला होता. त्याकाळामध्ये महाराष्ट्रात वस्त्रनिर्मिती, अलंकार, चामड्यांच्या वस्तू इत्यादीची निर्मिती केली जात असे. तत्कालीन काळात सांस्कृतिक जीवनाचा फारसा विकास झालेला आढळत नाही. सदर कादंबरीमध्ये सांस्कृतिक जीवन चित्रित झालेले आहे. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

तत्कालीन समाजात मोठ्याप्रमाणात अनेक सण व उत्सव साजरे करण्याची परंपरा होती. त्यामध्ये प्रामुख्याने दसरा, दिवाळी, गुढीपाडवा, रामनवमी, बेंदूर, गौरी-गणपती इत्यादी सण मोठ्याप्रमाणात साजरे केले जात. दसरा या सणाचे वर्णन या कादंबरीत चित्रित झालेले अहे ते पुढीलप्रमाणे, ''नीराबाईनी मोठ्या उत्साहानं दसरा सण साजरा केला. विठ्ठलाचं गुरूकुलातील विद्यार्जन पूर्ण झाल्यामुळं आणि घरात उत्साहाचं वातावरण निर्माण

झाल्यामुळं सीमोल्लंघनाच्या निमित्तानं पागोटे बांधायला सुरुवात केली, पागोटं बांधल्यावर सोनं लुटून झाल्यावर तो दारात मोठ्या डौलात उभा राहिला.''[१३]

त्याकाळी समाजात 'बेंदूर' या सणाच्या दिवशी बैलांची पूजा केली जात असे. तसेच चैत्र महिन्यात गुढ्या उभारून नववर्षाचे स्वागत करण्याची प्रथा होती. या सणामागील हेतू विठ्ठलपंत पुढीलप्रमाणे सांगतात, ''गुढीपाडव्याचा सणाचा दिवस. वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी पहिला महत्त्वाचा मुहूर्त. ब्रह्मदेवानं म्हणे याच मुहूर्तावर विश्व निर्माण केलं. आपणही या मुहूर्तावर चांगल्या कार्याला प्रारंभ करावा नवं विश्व, नवी सृष्टी उभी करावी, नवा संकल्प सोडावा, अशा योग्यतेचा हा मुहूर्त.''[१४] तसेच गावामध्ये रामनवमीचा उत्सवही साजरा केला जात असे.

तत्कालीन समाजात असलेल्या कला व क्रीडा यांचे प्रतिबिंब या कादंबरीत उमटलेले आहे. अभंग, भजन, कीर्तन, ओवी, फुगड्या, गजग्यांनी छप्पापाणी खेळणे, झाडकाठीचा खेळ, दांडी नृत्य, गर्भानृत्ये इत्यादी कला-क्रीडा त्याकाळी आस्तित्वात असल्याचे दिसते. रुक्मिणी आणि तिच्या तीन मैत्रिणी गजग्यानी छप्पापाणीचा खेळ खेळत होत्या. तर गुराखी मुले झाडकाठीचा खेळ खेळत होती. या खेळाचे वर्णन या कादंबरीत असे आलेले आहे, ''एका झाडावर गुराखी मुलं झाड काठीचा खेळ खेळत होती. रिंगणातील काठी फेकून पुन्हा वानरासारखी तुरूतुरू झाडावर चढत होती. उंचावर जाऊन लपून बसत होती. ज्याच्यावर डाव आलेला आहे. तो आपल्याला पकडू शकणार नाही अशा बेतानं लांब फांदीवर जाऊन बसत होती.''[१५]

### ४.५ तत्कालीन शिक्षण पद्धती :

त्याकाळी धार्मिक स्थळांच्या ठिकाणीच शिक्षणाची सोय असे. सर्वत्र शिक्षण केंद्रे नव्हती. ब्राह्मण मुलांचे उपनयनविधी झाल्यावर त्यांना गुरुगृही बारा वर्षे राहून शिक्षण पूर्ण करावे लागत. गुरुगृही शिक्षण घेत असताना तेथे मुलांना सकाळी लवकर उठून स्नान केल्यानंतर नैत्यनैमित्तिक कामाबरोबर गुरूंच्या घरचीही कामे करावी लागत. शिक्षण पूर्ण झाल्यावर विधीपूर्वक समारंभ विद्यार्थ्यांचा केला जात असे. त्याचे वर्णन या कादंबरीत असे आहे, ''बारा वर्षे गुरुगृही राहून ब्रह्मविद्या पारंगत झाल्यावर तो सर्वार्थ्यांनी ब्राह्मण पदवीस

पोहचतो, ब्रह्मविद् होतो. गुरू त्याला विधीपूर्वक शेवटचं स्नान घालून तो निष्णात झाला, असं घोषित करतात.''[१६] विठ्ठलपंत हे पैठण विद्यापीठाच्या पाठशाळेत विद्यार्जनासाठी बारा वर्षे होते. अशाच पद्धतीने त्यांचाही विधीपूर्वक समारंभ केला होता.

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान ही मुले विठ्ठलपंत या संन्याशाची असल्याने त्यांचे लहानपणी विधीपूर्वक मौजीबंधन झाले नाही. त्यामुळे त्या सर्वांना गुरुगृही राहून शिक्षण घेता आले नाही. तसेच ही मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून स्वत: विठ्ठलपंतांनी त्यांना शिक्षण दिले. तत्कालीन समाजामध्ये काही स्त्रिया शिक्षण घेत असत परंतु त्यांना पुरुषाप्रमाणे फारशे शिक्षण घेता येत नसे. सदर कादंबरीत तत्कालीन शिक्षण पद्धतीची माहिती फारच कमी आलेली आहे. त्याचप्रमाणे आर्थिक जीवनाचे चित्रणही अल्पच आलेले आहे.

### ४.६ समारोप :

आतापर्यंत सदर कादंबरीत आलेले समाजदर्शन अभ्यासले आहे. त्यावरून तत्कालीन काळातील समाजदर्शनाचे स्वरूप लक्षात येण्यास मदत होते. त्याकाळातील लोकांचे राहणीमान साध्य पद्धतीने असल्याचे दिसते. गावामध्ये अनेक लहान-मोठे व्यवसाय केले जात असून शेती हा प्रमुख व्यवसाय होता. तत्कालीन काळात प्रवास करण्यासाठी बैलगाडींचा व घोड्यांचा वापर करीत. समाजात श्रद्धा-अंधश्रद्धा व जातिभेद असल्याचे दिसते.

तत्कालीन काळामध्ये यादवांचे राज्य होते. धार्मिक स्थळांना महत्त्व होते. तसेच काही धार्मिक स्थळे ही नदींच्या तीरावर वसलेली असून त्यांच्याविषयी पुराण कथा असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे काही धार्मिक स्थळांच्या ठिकाणी यात्रा भरत होत्या. समाजात व्रते-वैकल्ये व नवस करण्याची प्रथा होती आणि तत्कालीन लोकांच्या जीवनावर कर्मकांडाचे ओझेही होते. त्याकाळी समाजात अनेक धर्मपंथ उदयास आले होते.

तत्कालीन समाजात सांस्कृतिक जीवनाचा फारसा विकास झाल्याचा आढळत नाही. त्याकाळी मोठ्याप्रमाणात सण व उत्सव साजरे केले जात होते. त्याचप्रमाणे समाजात काही कला व क्रीडा अस्तित्वात असल्याचे दिसते. तीर्थयात्रा, श्राद्धविधी, दानधर्म इत्यादीमध्ये समाज गुरफटून गेल्याचे दिसते. तसेच तत्कालीन काळात 'देवळे' ही मोठी सांस्कृतिक केंद्रे

असल्याचे दिसते. तत्कालीन समाजात धार्मिक ठिकाणीच शिक्षणाची केंद्रे असल्याने विद्यार्थ्यांना गुरुगृही बारा वर्षे राहून शिक्षण घ्यावे लागत. ब्राह्मण मुलांची मुंज झाल्यावरच त्यांना शिक्षण घेता येत होते. तसेच पुरुषाप्रमाणे स्त्रियांना फारसे शिक्षण घेता येत नसे.

सदर कादंबरीत आर्थिक जीवनाचे चित्रण अल्प आल्याचे दिसते. त्याकाळी समाजात लहान-मोठे व्यापार केले जात होते. ब्राह्मणांना वतनाची गावे दिल्यामुळे ते शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करीत. शेती हा व्यवसाय आर्थिक जीवनाचा कणा होता आणि शेतकरी उपजीविकेसाठी काही जनावरे पाळत होते. तत्कालीन समाजात सोन्याची नाणी चलनात असल्याचे दिसते.

तत्कालीन स्त्री जीवनाचे प्रतिबिंब या कादंबरीत उमटले आहे. स्त्रियांना स्वयंपाक व घरातील कामे करावी लागत. त्याकाळी स्त्रिया पतीच्या आज्ञेत असून त्या श्रद्धा-अंधश्रद्धा, नवस, व्रत-वैकल्ये इत्यादीच्या आहारी गेलेल्या होत्या. तत्कालीन समाजात विधवा स्त्रियांना व अपत्य प्राप्ती नसलेल्या स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा नव्हती. कन्या, पत्नी, माता अशा स्वरूपातच तिच्या जीवनाचे दर्शन या कादंबरीत आल्याचे दिसते. महाराष्ट्र हा खेड्यांनी बनलेला असल्याने तत्कालीन खेड्यांची व घरांची रचना कशी होती हे सदर कादंबरीत चित्रित झाल्याचे दिसते. त्याकाळी गावात अठरापगड जाती-जमातीचे लोक राहत असले तरी गावांमध्ये अस्पृश्यता पाळली जात होती. तसेच गावात 'धर्मसभा' घेतल्या जात होत्या.

अशाप्रकारे तत्कालीन समाजदर्शनाचे प्रतिबिंब सदर कादंबरीत उमटले आहे. यानंतर पुढील प्रकरणात सदर कादंबरीतील 'व्यक्तिरेखांचा' अभ्यास करावयाचा आहे.

## संदर्भ


१. पानसे, मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई, आवृत्ती पहिली, १९६३, पृ.क्र. ९२-९३.

२. यादव, आनंद, लोकसखा ज्ञानेश्वर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. आवृत्ती दुसरी, सप्टेंबर, २००६, पृ.क्र. २८२.

३. तत्रैव, पृ. क्र. ९५.

४. तत्रैव, पृ. क्र. ५०.

५. इर्लेकर, सुहासिनी, यादवकालीन काव्यसमीक्षा, धारा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९७९, पृ.क्र. २१.

६. पानसे, मु.ग., उ. नि, पृ.क्र. ११२.

७. यादव, आनंद, उ. नि, पृ.क्र. ३९८-९९.

८. तत्रैव, पृ.क्र. ४४८.

९. तत्रैव, पृ.क्र. ४२७.

१०. तत्रैव, पृ.क्र. ४३६.

११. तत्रैव, पृ.क्र. ४३५-३६

१२. तत्रैव, पृ.क्र. १४८

१३. तत्रैव, पृ.क्र. ७-८

१४. तत्रैव, पृ.क्र. ९९.

१५. तत्रैव, पृ.क्र. २६४.

१६. तत्रैव, पृ.क्र. १७८.